www.aiche.org/ccps

१० वा वर्धापन दिन Process Safety Beacon

http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx
उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

या आवृत्तीचे प्रायोजक
ioMosaic
www.iomosaic.com

# आपत्कालीन कार्यसिद्धता – टायटॅनिक दुर्घटना!

जुलै २०१२





उत्तर अटलांटीक महासागरात एका हिमनगाला धडकून सुमारे अडीच तासांनी टायटॅनिक जहाजाला जलसमाधी मिळाल्याच्या घटनेला १५ एप्रिल २०१२ रोजी १०० वर्षे पूर्ण झाली. इतिहासातील सर्वात प्रसिद्ध अशा या दुर्घटनेत १५०० पेक्षा माणसे मृत्यूमुखी पडली. टायटॅनिकच्या हानीवर हजारो पाने लिहीली गेंली आहेत त्याचप्रमाणे अनेक लघुपट आणि काल्पनिक चित्रपट काढण्यात आले. त्यांतील अनेक गोष्टी या जहाजाची बांधणी आणि त्याच्या कप्तान व खलाशांनी केलेल्या उपायांवर केंद्रीत होत्या. समस्या जहाज बांधणीची असो की जहाज चालवण्याची, एका गोष्टीकडे लक्ष दिल्याने अनेकांचे प्राण वाचले असते – आपत्कालीन कार्यसिद्धता!

टायटॅनिक बुडण्यापूर्वीच्या आपत्कालीन कार्यसिद्धतेतील काही महत्वाच्या तृटीः

- प्रवासी आणि खलाशांना अपुऱ्या जीवनरक्षक नौका, कदाचित जहाज बांधणाऱ्यांना ते कधी बुडू शकेल असेल वाटले नसेल.
- जीवनरक्षक नौका वापरण्याचा सराव केला नव्हता. अनेक लोकांना कोठे जायचे व काय करायचे ते माहीत नव्हते.
- टायटॅनिक सोडून जाणाऱ्या पहिल्या अनेक नौका पुरेशा भरल्याही नव्हत्या, नौका उलटण्याच्या भीतीने नौकांवरील काही प्रवासी बर्फाळ पाण्यातील लोकांना नौकेवर ओढून घेण्यास तयार नव्हते.
- जहाजाच्या झालेल्या नुकसानीचा आढावा घेऊन जहाज सोडून जाण्याचा निर्णय घेण्यात कप्तान व खलाशांना विलंब झाला. जर माणसे हवालदिल व्हायला लागण्यापूर्वी कप्तानाने जहाज रिकामे करणे चालू केले असते तर नौका जास्त भरल्या जावून जहाज सुनियोजितपणे रिकामे करता आले असते.

## आपण काय करू शकता?





- ➔ प्रक्रीया उद्योगांमध्ये अनेक प्रकारे आपत्कालीन सराव केला जात असेल. आग, गळती किंवा सांडलवंड झाल्यास प्रतिसाद, सुनिश्चित निवारा, सुरक्षित स्थलांतर, आणि प्रतिकूल हवामान हे सर्वसाधारण प्रकार. प्रत्येक परिस्थितीत तुमच्या जबाबदारीचे भान ठेवा – ती वेगवेगळी असू शकते.
- ➔ सराव करताना किंवा प्रत्यक्ष आणीबाणीच्या प्रसंगी ज्या व्यक्तिंना अशा प्रसंगी काय करावे हे ज्ञात नसू शकते अशा व्यक्तिंवर लक्ष ठेवा विशेषतः नवीन कर्मचारी, अभ्यागत आणि कंत्राटदार. त्यांना अशा परिस्थितीचा सुरक्षितपणे सामना करण्यास मदत करा.
- ➔ सराव करताना किंवा प्रत्यक्ष आणीबाणीच्या प्रसंगी तुम्हाला काही त्रुटी किंवा समस्या आढळल्यास लगेच तुमच्या पर्यवेक्षकाच्या निदर्शनास आणा. उदाहरणार्थ – उपलब्ध वेळेत पूर्ण केली जावू शकत नाहीत अशी कामे, आपत्कालीन परिस्थितीमुळे ज्या गोष्टी तुम्ही सुरक्षितपणे करू शकणार नाही, न दिसणारे किंवा संदिग्ध निर्गमन फलक, ऐकू न येणाऱ्या आपत्कालीन घंटा किंवा ध्वनीक्षेपक, उपलब्ध नसणारी किंवा व्यवस्थित काम न करणारी आवश्यक सुरक्षा साधने. तुमची निरिक्षणे कळवा – ती एखादे दिवशी कोणाचे तरी प्राण वाचवतील.
- ➔ आणीबाणीचा सराव गांभिर्याने घ्या आणि इतरांनाही तसे करण्याची जाणीव करून द्या. इतर खात्यांतील लोकांना भेटण्याची वेळ अशा दृष्टीते आणीबाणीच्या सरावाकडे पाहू नका आणि आणीबाणीचा सराव हा एक सामाजिक कार्यक्रम बनवा.
- ➔ जेंव्हा तुम्ही इतर कारखान्यातील घटनाविषयी वाचता तेंव्हा तुमचा कारखाना अधिक सुरक्षित करण्यासाठी त्या घटनेतून तुम्ही काय शिकलात असा प्रश्न स्वतःला विचारा.
- ➔ निकृष्ट आपत्कालीन आराखडा किंवा आणीबाणीचा सामना कसा करावा याबद्दलचे अज्ञान यामुळे तुमचा कारखाना "बुडू" देवू नका.

***प्रक्रीया सुरक्षेचे सगळेच धडे आपल्याला कारखान्यात मिळत नाहीत!***

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणासही पुनर्विक्रीसाठी वापर करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org किंवा ६४६–४९५–१३७१

हे बीकॉन सहसा अफ्रीकन, अरेबिक, चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, हंगेरियन, इंडोनेशियन, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तमिळ, थाई, तेलगू, तुर्की, उर्दू आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.